<u>राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका यांचे क्षेत्र वाढीमुळे या क्षेत्रात हस्तांतरीत होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक :- जिपब- ४८१७/प्र.क्र.५२२/आस्था-१४

२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,

मुंबई-४०० ००१

दिनांक : २५ जुलै, २०१९

<u>प्रस्तावना</u> -

राज्यातील शहरांचा जलद विकास करण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामीण भागांचा समावेश महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात करण्यात येतो. अशा ग्रामीण भागातील क्षेत्रांचा महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात समावेश करण्यात आल्यास या क्षेत्रातील जिल्हा परिषदांच्या शाळांचे हस्तांतर सर्व मालमत्तेसह महानगरपालिका/ नगरपालिका यांचेकडे करणे क्रमप्राप्त ठरते. तथापि अशा जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सेवा महानगरपालिका/ नगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत करावयाची कार्यपध्दती विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका यांचे क्षेत्रवाढ/हद्दवाढीमुळे या क्षेत्रातील जिल्हा परिषदांच्या शाळा महानगरपालिका/नगरपालिका या संस्थांकडे हस्तांतरीत करण्यात आल्यास अशा शाळांमध्ये संबंधित जिल्हयातील शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करण्यासाठी पुढील कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

i. महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रवाढीमुळे हस्तांतरीत होणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमधील एकूण शिक्षक पदांचा आढावा घेण्यात यावा.

ii. संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी हद्दवाढीमुळे त्यांच्या अखत्यारीतील गावे महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रात गेल्यास व त्यासोबत जिल्हा परिषदेच्या शाळा ही जात असल्यास संबंधित महानगरपालिका/नगरपालिकांना कोणत्या माध्यमाच्या शाळेस किती शिक्षकांची आवश्यकता आहे,याची मुख्य कार्यकारी आधिकारी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिकेच्या अनुक्रमे आयुक्त व मुख्याधिकारी यांच्याकडे विचारणा करतील. त्यानुसार एकदा शिक्षकांची माध्यमनिहाय संख्या निश्चीत झाल्यानंतर, जिल्हा परिषदेकडे, शिक्षक अतिरिक्त होत असल्यास, या शासन निर्णयात स्पष्ट केलेल्या कार्यपध्दतीनुसार शिक्षकांच्या सेवा संबंधित महानगरपालिका/ नगरपालिकेकडे हस्तांतरीत/समायोजित करण्यात याव्यात.

iii. या पदांवर शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करण्यासाठी प्रत्येक पदाच्या संवर्गानुसार जिल्हयातील सर्व शिक्षकांकडून विकल्प घेण्यात यावे.

iv. सेवा वर्ग करण्यास इच्छुकतेचा विकल्प देणाऱ्या शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी तयार करुन प्रसिध्द करण्यात यावी.

v. सदर यादीनुसार महानगरपालिका/नगरपालिका या संस्थांकडे हस्तांतरीत झालेल्या जिल्हा परिषदांच्या शाळांवर शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करण्यात याव्यात.

vi. प्रस्तुत आदेशानुसार विहित करण्यात आलेली प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करावयाच्या आदेशाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर करण्यात यावी.

vii. ज्या जिल्हा परिषद शाळा महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत, अशा जिल्हा परिषद शाळांवर कार्यरत असणा-या शिक्षकांच्या सेवा प्रस्तुत प्रक्रियेमुळे महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडे हस्तांतरीत न होता जिल्हा परिषद शाळांवर बदली झाल्यास अशा शिक्षकांना पुढील एक वर्ष बदलीतून सूट देण्यात यावी. तथापि, असे शिक्षक त्यापुढील शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली धोरणानुसार बदलीस पात्र होतील.

२. उपरोक्त निर्देशानुसार संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२५१७३७४६०६२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.07.26 13:30:33 +05'30'

(प्रि.शं.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१०. उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)

११. माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

१२. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग

१३. निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई